# <u>सिंहगड रोड पो.ठाणे प्रेसनोट दि. ०७/०६/२०१९</u>

## “3rd EYE PROJECT” च्या अनुषंगाने सिंहगडरोड भागातील नगरसेवकांची मिटींग घेवुन त्यांना सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याबाबत केले आवाहन.

---

मा. पोलीस आयुक्त सो. पुणे शहर यांचे संकल्पनेनुसार व मार्गदर्शनाप्रमाणे सीसीटीव्ही वॉच उपक्रमा अंतर्गत दि. ०५/०६/२०१९ रोजी १७.३० वा. ते १८.०० वा. चे दरम्यान मिटींग आयोजीत करण्यात आली. सदर मिटींगला नगरसेवक श्री. राजाभाऊ लायगुडे व प्रसन्न जगताप व त्यांचे कार्यकर्ते हजर होते. सिंहगडरोड पो.स्टे. हद्दीमध्ये नगरसेवकांचे विकास कामाचे निधीमधुन सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याबाबत दुर्योधन पवार वरिष्ठ पोलीस निरीक्षक, सिंहगडरोड पो.स्टे. पुणे शहर व पोलीस उप-निरीक्षक गिरीष सोनवणे यांनी उपस्थित नगरसेवकांना पुणे पोलीस आयुक्तालयाकडून **“3rd EYE PROJECT”** च्या अनुषंगाने पुणे शहरामध्ये घरफोडी, चोरी, चैन स्नॅचींग सारख्या गुन्हयांना आळा बसविण्याकरीता सीसीटीव्ही कॅमे-यांची आवश्यकता व उपयोग या संदर्भात उपक्रमाबाबत माहिती देवुन सिंहगडरोड पो.स्टे. हद्दीत धायरी फाटा, गारमाळ, गणेशनगर, उंब-या गणपती चौक, दळवीवाडी, रायकरमळा, बेनकरवस्ती, पारी कंपनी चौक, नहे गाव, हिंगणे, विठ्ठलवाडी, सनसिटी या भागात जास्तीत जास्त कॅमेरे बसविण्याबाबत चर्चा करुन त्यांना सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याबाबत आवाहन केले. उपस्थित नगरसेवकांनी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याची तयारी दाखवुन **“3rd EYE PROJECT”** हा एक चांगला उपक्रम असल्याबाबत सदर उपक्रमाची स्तुती केली आहे.

